**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०३/२०१८ मधील निशाणी ६, ८ व १० वरील एकत्रित आदेश**

(CNR NO.MHST-070064372018)

सुरेश शिवराज हुलावळे व इतर --- अर्जदार

वि.

माणिक दत्तात्रय नगरे --- सामनेवाला

सदरहू अर्ज प्रस्तावित अर्जदार यांनी मयत अर्जदार यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब व मयताचे वारस मुदतीत अभिलेखावर न आणलेने त्यांच्याविरूध्द अर्ज रद्द झालेबाबतचा आदेश (Abatement) रद्द होवून मिळणेकरीता व मयतांचे वारस अभिलेखावर घेवून त्याबाबत अर्जात आवश्यक दुरस्ती करण्याकरीता दाखल केला आहे. सदर तिन्ही अर्जांच्या पुष्टयर्थ प्रस्तावित अर्जदार क्र. १अ ते १क यांनी शपथपत्र दाखल केले आहे. त्यावर सामनेवाला यांचे म्हणणे मागविण्यात आले. सामनेवाला यांनी सदर तिन्ही अर्जावर म्हणणे दाखल केले नाही. करीता, सदर तिन्ही अर्ज सामनेवालाचे म्हणण्याशिवाय पुढे चालविण्यात आले.

२. प्रस्तावित अर्जदारचे वकीलांनी कथन केले की, अर्जदार सुरेश शिवराम हुलावळे हे दि.०३/०८/२०२४ रोजी मयत झाले. सदरचा अर्ज दाखल करणेस विलंब झाला आहे. अर्जदार हे मयत झालेने प्रस्तावित अर्जदार यांना विहित कालावधीमध्ये अभिलेखावर घेण्याची तजवीज करता आली नाही. अर्ज चालविण्याकरीता अबेटमेंटचा आदेश रद्द करून सदरचा अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

३. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदारचे वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अर्जदार सुरेश शिवराम हुलावळे हे दि.०३/०८/२०२४ रोजी मयत झालेबाबत मृत्यूउतारा दाखल केला आहे. त्यामुळे अर्जदार सुरेश शिवराम हुलावळे हे दि.०३/०८/२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसून येते.

**४.** अर्जदार यांना मयत अर्जदार क्र. १अ व १क यांचे वारसांविरूध्द अर्ज पुढे चालविण्याचा अधिकार प्राप्त होत असल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ प्रमाणे त्यांना दाव्यात पक्षकार करणे आवश्यक आहे. सदरचे अर्ज दाखल करणेस विलंब झालेला आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबतचे समाधानकारक स्पष्टीकरण अर्जांमध्ये नमूद करण्यात आलेले आहे. वादीचा झालेला विलंब जाणीवपूर्वक असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदरचे तिन्ही अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालील आदेश.

**– : आ दे श :–**

१. अर्ज (निशाणी क्र. ६, ८ व १०) मंजूर करण्यात येते.

२. मयत अर्जदार क्र. १ यांचे वारस १अ ते १क यांचे वारस अभिलेखावर आणण्यास झालेला उशीर माफ करण्यात येत आहे.

३. मयत अर्जदार क्र. १अ ते १क यांच्याविरूध्द वारस मुदतीत अभिलेखावर न आणलेने त्यांच्याविरूध्द दावा रद्द झालेबाबतचा आदेश (Abatement) रद्द करण्यात येत आहे.

४. अर्जदार यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित दुरूस्ती १४ दिवसांच्या आत करून घ्याव्यात व सोबत दुरूस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

५. सदरील अर्जांचा खर्च अंतीम आदेशास अनुसरून राहील.

Digitally signed by ASHA VISHAL MOHITE
Date: 2026.01.12 14:56:32 +0530

कराड. (श्रीमती ए.व्ही.मोहिते )

दि. ०८/०१/२०२६. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कराड.

ता. कराड, जि.सातारा.